# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

NAAC - ACCREDITED 'A'

# युवक महोत्सव

२०१३-१४




## नियमावली पुस्तिका



युवक महोत्सव २०१३-१४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

विद्यार्थी कल्याण विभाग

# युवक महोत्सव
२०१३-१४

# नियमावली पुस्तिका

# विद्यापीठ गीत

गीत आमुचे आकाशाचे गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे जनामनाचे गीत आमुचे जागराचे
अभंगाचे ओवीचेही
मायबोलीचे माहेर
वाऱ्यातही मराठीचे
दिवे लख्ख घरोघर
संत-महंताचे विरागी गीत आमुचे वादळाचे
तंतू तंतू संघर्षाचा
पैठणीत भिनलेला
नक्षीतच पक्षी पक्षी
विजयाचा विणलेला
सोनपहाटेचे उदयाचे गीत आमुचे उजेडाचे
प्रज्ञेचा सुर्य नवा
शब्द शब्द उजळून गेला
समतेचा संगराचा
अर्थ ढाळून गेला
विराट विशाल संस्कृतीचे गीत आमुचे जीवनाचे

**-फ.मु. शिंदे**

# प्रतिज्ञा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत

आम्ही सर्व विद्यार्थी – विद्यार्थीनींना या युवक महोत्सवामध्ये भारतीय कलेचा वारसा घेऊन स्वतःच्या कला गुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. आमचा सहभाग उत्कर्षमय, आनंदमय ठरवण्यासाठी भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य, सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगून हा युवक महोत्सव आनंदमय करू. जाती–धर्मापलीकडील सामुहिक सहजीवन, दुर्बलांची जाण, वैचारिक अधिष्ठान, त्याग भावना आणि प्रसंगी न्याय भूमिकेसाठी संघर्ष करण्याची तयारी यातूनच राष्ट्र निर्माण होत असते व याची आम्हास जाणीव आहे. आमच्या उदात्त, उदारमतवादी मूल्य परंपरेला साक्षी ठेऊन बुद्धिनिष्ठ आणि विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटीबद्ध होणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. या युवक महोत्सवातून उपरोक्त सर्व बाबी आमच्यामध्ये विकसित व्हाव्या यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णतः शांततेत आणि आनंदात पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत. आम्ही अशीही प्रतिज्ञा करत आहोत की सर्व कलाप्रकाराच्या माध्यमातून कणखर मनुष्य व बलशाली भारत निमार्ण करण्यासाठी प्रयत्न करू .जय हिंद !

# मनोगत



डॉ. विजय पांढरीपांडे
कुलगुरू

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित युवक महोत्सव यंदा विद्यापीठ परिसरातच होतो आहे ही विशेष आनंदाची बाब... ह्या निमित्ताने इतर महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना हा ज्ञानाने, निसर्गाने श्रीमंत परिसर अनुभवायला मिळेल. नाट्य, नृत्य, संगीत, साहित्य, कला ह्यांचा सृजनात्मक अविष्कार ह्या महोत्सवाच्या निमित्ताने बघायला मिळतो. विद्यापीठातील अभ्यास म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे. किंबहुना कला-विज्ञान तंत्रज्ञानाच्या अभ्यासाबरोबरच साहित्यिक, सांस्कृतिक, शारीरिक, मानसिक, असा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास तरूणाईसाठी अपेक्षित असतो. आपले खरे चारित्र्य हे वागण्या बोलण्यातून, सांस्कृतिक जडण घडणीतून प्रगट होत असते. नृत्य, नाट्य संगीतात ताल-चाल, नाद, संवाद ह्यालाच महत्त्व असते. अनेक कलांतून सांघिक कलात्मक अविष्कार घडत असतो. इथे टीम स्पिरीटला महत्त्व असते. स्वतःलाच नव्हे तर आपल्या बरोबरीच्या साथीदार कलावंताला देखील सांभाळून घ्यावे लागते. एरवी सगळेच बेसूर, बेताल होण्याची शक्यता असते.

अशा स्पर्धांमध्ये जय-पराजयापेक्षा आपल्या कलेचे, गुणांचे प्रामाणिक सादरीकरण जास्त महत्त्वाचे. कलाक्षेत्रात यशाचे शिखर गाठायचे तर प्रचंड साधना हवी. संयम हवा, जिद्द-चिकाटी हवी. त्यासाठी भरपूर परिश्रम घ्यावे लागतील. पराजयाने खचून न जाता नव्या जोमाने पुढच्या तयारीला लागावे. ह्या स्पर्धेत सहभागी होणारे सर्व संघ, सर्व कलाकार हे तुल्यबळ असतात. कुणी आज जिंकेल, कुणी उद्या आपला नंबर यायला वाट बघावीच लागेल. शंभर टक्के झोकून देणे, निष्ठेने सादरीकरण करणे हेच जास्त महत्वाचे. ह्या तीन दिवसाच्या उत्सवात, उत्साहात, जल्लोषात प्रत्येक विद्यार्थ्याला काही ना काही नवे शिकता आले, सहकलावंताला देता आले, दुसऱ्यांकडून काही घेता आले तर विद्यापीठाच्या उपक्रमाचे खऱ्या अर्थाने सार्थक झाले असे मी समजेन. शिस्तभंग न व्हावा ही अपेक्षा.

सर्वांनाच युवक महोत्सवासाठी अनेक हार्दिक शुभेच्छा...!

**डॉ. विजय पांढरीपांडे**
कुलगुरू

युवक महोत्सव २०१३-१४

# मनोगत



डॉ. डी.आर. माने
कुलसचिव

मित्र हो,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या युवक महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व कलाकार, संघ व्यवस्थापकांचे मन:पुर्वक स्वागत करत असताना मनस्वी आनंद होत आहे. आपल्या विद्यापीठाने सर्वच क्षेत्रात यशस्वी व दिमाखदार वाटचाल केली आहे, सांस्कृतिक क्षेत्रात ही विद्यापीठाचा झेंडा उंचच उंच आहे साहित्य, संगीत, नाट्य, शिल्प चित्र व चित्रपट क्षेत्रात ही विद्यापीठाच्या कलाकारांनी आपला ठसा उमटविला आहे. हाच वारसा घेऊन या विद्यापीठाचा विद्यार्थी जीवनाच्या व कलेच्या क्षेत्रात विजयी घोडदौड करत आहे.

आपल्या विद्यापीठाच्या युवक महोत्सवामध्ये सहभागी व पुढे राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये सहभागी विद्यार्थी कलाकार आज फिल्म, टेलिव्हिजन, सिरियल, व्यावसायिक नाटकांमध्ये काम करत आहेत, याचा आम्हास रास्त अभिमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व युवा विद्यार्थी कलावंताच्या सुप्त सृजनशीलतेचे व कलागुणांचे कौतुक व्हावे, या क्षेत्रात त्यांची वाटचाल दमदार व्हावी म्हणून विद्यापीठाने युवक महोत्सवाच्या रुपाने हा सांस्कृतिक सोहळा आयोजित केला आहे. नवनव्या कल्पनेने नव्या कृतिशील पातळीवर उधळलेल्या या नवरंगात आपल्या जीवनाचे इंद्रधनुष्य होईल याची आम्हास खात्री वाटते.

युवक महोत्सवामध्ये आपल्यातील भेदभाव विसरुन राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी व तसेच निर्मळ आनंद घेण्यासाठी नवचेतना निर्माण करण्यासाठी विद्यार्थी कलावंत निष्ठेने काम करतील असा आम्हास विश्वास वाटतो. मला वाटते हे सर्व करत असताना आपण सर्वांनी एकतेचा ध्वज खांद्यावर घ्यावा अभिमानाने राष्ट्रगीत गावे आभाळाएवढी स्वप्ने उराशी बाळगून ध्येय वेड्यासारखे मार्गक्रमण करावे, उद्याचा उज्वल भविष्यकाळ तुमची वाट पाहत आहे. नटराजाच्या या आंगणात, प्रागंणात तुमचेकडून मैत्रीची समंतीची गीत हवीत. या साठीच युवक महोत्सवाचे आयोजन केले आहे.

मित्र हो, निमित्त आहे युवक महोत्सव, आपल्या सारख्या कलाकारांच्या भेटीचा आनंद खूप वेगळा आहे युवक महोत्सव म्हणजे संगीत, नृत्य, नाटय वाड्मय, ललित कलेच्या सृजनाचा अविष्कार तर असतोच परंतु त्याचबरोबर फाटलेल्या, तुटलेल्या माणसाच्या चेहऱ्यावर हास्यच इंद्रधनुष्य निर्माण व्हावं. त्यासाठी आपण सर्व मिळून कटिबद्ध राहू यात ही प्रांजळ अपेक्षा आहे. आपण सगळे जण मिळून माणसाचं व माणुसकीचं गाणं गाऊयात मला वाटत आपल्या कलेतून व एकजुटीतून हे सगळ शक्य होऊ शकतं.

या युवक महोत्सवात उत्साह, शिस्त व राष्ट्रीय चरित्र टिकवून ठेवण्यात आपण कमी पडणार नाहीत हा विश्वास आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून व माझेकडून सर्व विद्यार्थी कलावंत व संघ व्यवस्थापकांना हार्दिक शुभेच्छा...!

**डॉ. धनराज माने**
कुलसचिव

# मनोगत



डॉ. चेतना सोनकांबळे
संचालक

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रिय युवक महोत्सव विद्यापीठाच्याच प्रांगणात संपन्न होत असल्याबद्दल विद्यापीठ प्रशासन व संयोजन समितीच्या वतीने सर्व सहभागी विद्यार्थी कलावंताचे, उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत.*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञान, तसेच सामाजिक जाणीव विद्यार्थ्यात समृद्ध करणारे विद्यापीठ आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जात असतांना ज्ञान विज्ञानाच्या विविध शाखा बरोबरच विद्यार्थ्यात कला, साहित्य, संस्कृती लोकमानस व येथील वैभवशाली परंपरेने विकसित झालेले व्यक्तिमत्व घडवणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. पैठणची वैभवशाली वस्त्रकला जगाला दिपवत असे. अजिंठा, कैलास लेणे हे संबंध जगाला धर्म, संस्कृती, शिल्प संस्कारासाठी प्रेरणा देते, प्रज्ञा व शीलाच्या संस्कारासोबतच ज्ञानेश्वरांनी याच प्रदेशातून संबध जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. मुकुंदराज, चक्रधर स्वामी यांच्या कार्यानी साहित्य सेनेचा वारसा लाभलेला हा प्रदेश, सुफीसंत, वारकऱ्यांचे अभंग, एकनाथाचे भारूड, यासह नामदेवांनी पंजाबपर्यंत येथील लोकमनाची वैभवी पताका फडकावली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजांनी, कृष्णदेवरायांनी, या मातीली समृद्ध केले आहे. महदंबा, जनाबाई, मुक्ताई यांच्या वारस्याची साक्ष देणारा हा प्रदेश विद्यार्थी कलावंतांना नव्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा देतो आहे.*

*विद्यार्थी कलावंताच्या बौद्धिक, वैचारिक जडणघडणची सोबतच लोककला, लोकसंस्कृती, संगीत नृत्य, नाट्याचा मराठवाडी लोकधारणीची महाराष्ट्र धर्म वाढवणारी परंपरा विकसीत करण्यासाठी युवक महोत्सवांचे आयोजन केले जाते. नवनवीन अनुभवांनी आणि अनुभूतींनी थरथरणारं युवामन कला, संगीत, लोकनाट्य, लोकनृत्यास रंगून जाईल. साहस, उत्साह व विरत्वाची बीजारोपण करणारा हा महोत्सव तरूणांच्या कलासक्त मनाला साद घालतो आहे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब निश्चितच यात फुलत जातील त्यांना चैतन्याचे, सृजनाचे मने घुमारे फुटतील त्यांच्या अंतर्मनाची ज्योत तेवत ठेवण्यास हा महोत्सव ऊर्जा देईल. त्यातूनच देशाला राष्ट्रीय चारित्र्य, शिस्त उत्साह, कलासक्त व आव्हान पेलणारे विद्यार्थी घडतील.*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याचे प्रतीक बनणाऱ्या विद्यार्थी कलावंताचे, सहभागी अभ्यागतांचे केंद्रीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात मनःपूर्वक स्वागत... शुभेच्छा...!*

**डॉ. चेतना प्र. सोनकांबळे**
संचालक
विद्यार्थी कल्याण

# संगीत विभाग (Music Events)

## ※ शास्त्रीय गायन ※
(हिन्दुस्थानी / कर्नाटकी)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्रत्येक गायकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धतून बाद होईल.
४) या स्पर्धेत फक्त हिंदुस्थानी व कनार्टकी संगीतालील राग सादर करता येईल.
५) स्पर्धकाचे लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.
६) स्पर्धेचा निर्णय रागाची निवड, स्वर, ताल, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
७) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.

## ※ उपशास्त्रीय गायन ※

१) एका महाविद्यालयातून एकच प्रवेशिका पाठवण्यात येईल.
२) प्रत्येक स्पर्धकास सादरीकरणासाठी ८ ते १० मिनिटांचा अवधी दिला जाईल.
३) साथीदाराची संख्या दोन असावी.
४) उपशास्त्रीय गायन प्रकार हिन्दुस्थानी अथवा कर्नाटकी असावा.
५) चित्रपटातील गीत गायनास परवानगी नाही.
६) स्वर, ताल, रागाची निवड, रचना आणि सामान्य परिणाम या गोष्टीचा विचार निर्णय प्रक्रियेत केला जाईल.
७) ठुमरी, कंजरी, टप्पा, होरी नाटयगीत इत्यादी प्रकारांचा समावेश होईल.

## ※ शास्त्रीय सुरवाद्य ※

१) सूरवाद्यामध्ये सतार, सरोद, व्हायोलिन, हार्मोनिअम व बासरी, सांरगी, सुन्द्री, संतूर, रूद्रवीणा, इत्यादी वाद्यांचा समावेश आहे.
२) स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
३) स्पर्धकांनी त्यांच्याबरोबर स्वतःची वाद्ये आणावीत.
४) विजेवर चालणारी वाद्ये स्पर्धेसाठी वापरता येणार नाहीत.
५) स्पर्धकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
६) स्पर्धकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
७) स्पर्धेच निर्णय लय, ताल, सुरेलपणा, सादरीकरण इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
८) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.
९) शास्त्रीय सुर वाद्यमामध्ये फक्त हिदुस्थान व कर्नाटकी संगीतमय वाजवावी

# * शास्त्रीय तालवाद्य *

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्रत्येक गायकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.
५) विजेवर चालणारी वाद्ये स्पर्धेसाठी निवडता येणार नाही.
६) स्पर्धेचा निर्णय ताल, लय, सुरेलपणा व सादरीकरणा इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
७) तबला या वाद्याबरोबरच मृदंग, ढोलकी, पखवाज, संबळ, दिमडी या वाद्यांच्या समावेश शास्त्रीय तालवाद्य स्पर्धेमध्ये करण्यात आला आहे.
८) शास्त्रीय तालवाद्यामध्ये हिन्दुस्थानी किंवा कर्नाटकी संगीतच वाजवावे.

# * सुगम गायन *
## (भारतीय)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्राथमिक तयारीसाठी स्पर्धकास ५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकाला किमान ४ मिनिटे व कमाल ६ मिनिटे वेळ दिला जाईल.
४) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त १५ सेंकद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.
६) स्पर्धकास कोणतेही सूरवाद्य (उदा- पेटी, व्हायोलिन, मेंडोलिन इ. ) व तालवाद्य
(उदा- तबला, बोंगो, ढोलक इ.) आणता येईल.
७) या स्पर्धेत मराठी अथवा हिंदी भाषेतील भावगीत, भक्तीगीत, अभंग किंवा गझल सादर करता येईल.
८) स्पर्धेचा निर्णय गाण्याची निवड, स्वर व सादरीकरण आणि एकूण परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
९) चित्रपट गीतास परवानगी दिली जाणार नाही.
१०) स्पर्धकरीता कोणत्याही इलेक्ट्रीक वाद्याचा वापर करता येणार नाही.
११) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.

# * सुगम गायन *
## (पाश्चात्य)

१) एका महाविद्यालयात एक प्रवेशिका पाठवता येईल
२) गायनासाठी ४ ते ६ मिनिटांच अवधी असेल.
३) जास्तीत जास्त दोन वादक साथीदार आणावेत.
४) स्वतःचे वाद्य आणावे.
५) गायनासाठी इंग्रजी गीतच असावे
६) स्वर, ताल, रागाची निवड, रचना, सर्व सामान्य परिणाम या गोष्टीचा विचार निर्णय प्रक्रीयेत केला जाईल.

## * समूह गायन *
### (भारतीय)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठविता येईल.
२) समूहगीत मराठी किंवा हिंदीत सादर करता येईल.
३) चित्रपटातील समूहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
४) संघ मुलांचा, मुलीचा अथवा मुला-मुलींचा असू शकेल.
५) गायनाचे मूल्य लक्षात घेऊनच निर्ण दिला जाईल. तो वेशभूषा, पोषाख अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
६) दोन समूह गीतास किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटे वेळ दिला जाईल.
७) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
८) प्रत्येक संघाने दोन समुहगीते सादर करावयाची आहेत. त्यापैकी एक देशभक्तीपर गीत व एक लोकगीत असलेच पाहिजे.
९) या स्पर्धेत तीन साथीदारांचा वापर करता येईल.
१०) साथीदार वगळून संघात कमीत-कमी ४ व जास्तीत - जास्त ६ स्पर्धक असतील.
११) पाश्चात्य वाद्यांचा वापर करता येणार नाही. तसेच पूर्वध्वनिमुद्रित कॅसेट, टेप अशा संगीताचा वापर करता येणार नाही.

## * समूह गायन *
### (पाश्चात्य)

१) एका महाविद्यालयास एक प्रवेशिका पाठवता येईल.
२) जास्ती जास्त ६ गायक व ३ वादक संघात सहभागी करता येतील.
३) समुहगीत पाश्चात्यसाठी इंग्रजी गाणे असावे.
४) चित्रपट गीतांचा वापर करू नये.
५) जास्तीत जास्त १० मिनीटाचा वेळ सादरीकरण्यासाठी )असेल. सेटिंगला ५ मिनिट
६) या कलाप्रकाराचा निर्णय गायणाचा दर्जा यावर ठरवला जाईल. मेकअप, वेशभूषा, आणि हावभाव याचा विचार निर्णयासाठी केला जार नाही.

## * शास्त्रीय नृत्य *

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) शास्त्रीय नृत्यामध्ये खालील नृत्य प्रकारांचा समावेश राहील.
अ) भरतनाट्य ब) कथ्थक क) कुचिपुडी ड) मणिपुरी
३) वरीलपैकी एका नृत्याच्या आविष्कार स्पर्धकास सादर करता येईल.
४) प्राथमिक तयारीसाठी ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
५) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
६) जास्तीत जास्त ३० सेंकद अधिकचा वेळ मान्य करणयात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
७) साथीदाराऐवजी ध्वनीमुद्रितांचा (कॅसेट, सी. डी. ) वापर करता येणार नाही.
८) फक्त भरतनाटयम स्पर्धेसाठी ध्वनीमुद्रितांचा, (कॅसेट.सी.डी.) वापर करता येईल.
९) स्पर्धकांनी जास्तीत-जास्त दोन साथीदार आणावेत.
१०) चित्रपटातील शास्त्रीय नृत्ये स्पर्धेत सादर करता येणार नाहीत.

# * लोक / आदिवासी नृत्य *

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठविता येईल
२) भारतीय आदिवासी अथवा भारतीय लोकनृत्य असावे.
३) संघ मुलांचा मुलीचा अथवा मुला-मुलींचा असू शकेल.
४) या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या कमीत कमी ४ आणि जास्तीत जास्त १० असावी.
५) संघाबरोबर वाद्य साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ५ असावी.
६) नृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला फक्त १० मिनिटांचा वेळ दिला जाईल.
७) लोकनृत्य किमान ८ मिनिटांचे व कमाल १० मिनिटांचे असावे.
८) जास्तीत जास्त ३० सेंकद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
९) लोकनृत्यासाठी वेशभूषा, रंगभूषा, व पार्श्वसंगीत अनुषंगिक व सुसंगत असणे आवश्यक आहे.
१०) सिनेसंगीतावर आधारीत लोकनृत्यास परवानगी नाही
११) अश्लील व बीभत्स लोकनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
१२) लोकनृत्य सादर करताना कोणत्याही प्रकारचे ध्वनिमुद्रित (टेप रेकॉर्डर, रेकॉर्ड प्लेअर, सी. डी. प्लेअर) इत्यादी साहित्यांचा वापर करता येणार नाही.
१३) नृत्याचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सादरकर्त्या संघानेच रंगमंच स्वच्छ व रिकामा करून देणे आवश्यक आहे.
१४) स्फोटके, ज्वलनशील पदार्थाचा वापर करू नये. (उदा.फटाके, ॲटमबॉम, दारूगोळा,पेट्रोल, डिझेल इत्यादी.)
१५) मूल्यमापन तालबद्धता, रचना, मुद्रा, रंगभूषा/वेशभूषा इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
१६) लोकनृत्यासंबंधिची पार्श्वभूमी, प्रदेश आणि नृत्याची वैशिष्टये प्रतिपादन करणारी माहिती दोन प्रतिमध्ये सादर करावी. ज्यावर कोड क्रंमाक लिहलेला असेल. महाविद्यालयाची खूण अथवा ओळख पटणारी माहिती जर लिहिली असेल तर तो संघ बाद ठरवला जाईल.

# * क्रिएटीव्ह नृत्य *

१) एका महाविद्यालायास एकच संघ पाठवता येईल.
२) जास्तीत जास्त १० मिनिटाचा अवधी असेल. फक्त मुले/मुली अथवा मुला-मुलीचा मिश्र संघ तयार करता येईल.
३) जास्तत जास्त ३ वादक साक्षदाराचा वापर करता यईल.
४) सी. डी. कॅसेट अथवा तत्सम इलेक्ट्रॉनिक वस्तुचा वापर संगीतासाठी करून त्यावर नृत्य केल्यास संघ बाद ठरविण्यात येईल.
५) निर्णय ताल, तंत्र (Creativity) सर्जनशिलता, अभिनय, अभिनव (Innovation) वेशभूषा, पदन्यास आणि सर्वसामान्य परिणाम सादर आहे.

# * लोकवाद्य वृंद *
## (Folk Orchestra)

१) एका महाविद्यालयास एकच संघ पाठवण्यात येईल.

२) संघ १२ कालवंतांचा असावा.

३) संघ मुले/फक्त मुली किंवा मुला/मुलीचा असू शकतो

४) सादरीकरणासाठी कमीत कमी ६ मिनिट व जास्तीत जास्त १० मिनिटांचा अवधी असेल.

५) रंगमंच / वाद्यवृंदाच्या सेटिंगसाठी ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.

६) जास्तीत जास्त ३ व्यवसायिक कलावंताचा वापर या कलाप्रकारासाठी करता यईल.
तीन व्यवसाईक कलावंताची वेशभूषा विद्यार्थी कलावंतापेक्षा वेगळी असली जेणेकरनू तो सहज ओळखता येतील यास तीन कलावंताची माहिती पासपोर्ट साईज फोटोसहीत युवक महोत्सव विद्यापीठ आयोजन समितीकडे देणे बंधनकारक आहे.

७) व्यवसायिक कलावंत विद्यार्थी कलवंतासोबत उभे राहणार नाहीत ते तीन कालवंत रंगमंचार वेगळ्या ठिकाणी उभे राहतील अथवा बसतील या कलावंतांना संघाचे नेतृत्व करता येणार नाही.

८) चित्रपट संगीताचा तुकडा अथवा चित्रपट गीताचा काही भाग या वाद्यवृदांना वाजविण्याची परवानगी नाही.

९) भारतीय अथवा परदेशी वाद्यांची नक्कल करता येत नाही.

१०) वाद्यवृदांना ताळमेळ आणि रचना भारतीय लोक संगीतावर अधारीत असावी.

११) पायामध्ये पाश्चात्य अथवा अभिजात वाद्यांचा वापर असू नये.

# वाङ्मय विद्या (Literary Events)

## * प्रश्नमंजुषा *

१) प्रत्येक महाविद्यालयातून तीन विद्यार्थ्यांचा एक संघ पाठविता येईल.
२) प्रथम स्पर्धक विद्यार्थ्यांची सांघिक लेखी परीक्षा घेतली जाईल. परीक्षेचा कालावधी अर्धा तसा असेल.
३) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका विद्यापीठात तयार केली जाईल. प्रश्नपत्रिका खालील विषयावर आधारित असेल.
४) लेखी स्पर्धेत गुणवत्ता यादी गुणानुक्रमे क्र. १ ते ५ मध्ये स्थान मिळविणाऱ्या स्पर्धक संघाची परीक्षा तोंडी स्वरूपाची असेल व यावेळी दृक-श्राव्य (Audio Visual) साधनाचा सुद्धा वापर करण्यात येईल.
१) भारतीय इतिहास २) प्रचलित घडामोडी ३) क्रीडा ४) कला/साहित्य व विज्ञान सामान्य विज्ञान इत्यादी.
५) याशिवाय नियमाबाबतचा अधिकचा खुलासा स्पर्धा सुरू होण्यापूर्वी परीक्षा हॉलमध्ये करण्यात येईल.
६) तोंडी स्पर्धा ही इंग्रजी / मराठी माध्यमातून होईल.

## * वक्तृत्व *

(मराठी, हिंदी, इंग्रजी)

१) प्रत्येक महाविद्यालयास एक संघ पाठवता येईल संघ एक विद्यार्थ्याचा असेल
२) स्पर्धकास मराठी, इंग्रजी, अथवा हिंदी भाषेत बोलता येईल
३) वक्तृत्व स्पर्धकाला विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत घोषित करण्यात येईल.
४) सादरीकरणासाठी सहभागी स्पर्धकाचे लॉटस काढून त्यांना बोलवण्यात येईल.

## * वाद विवाद *

१) स्पर्धेसाठी विषयाच्या बाजूने व विरूद्ध बाजूने बोलणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी असेल.
२) यात भाग घेणारे विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यापैकीच असतील.
३) या स्पर्धेत मराठी, हिंदी, अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत बोलता येईल. मात्र तिन्ही भाषेमधून स्वतंत्र क्रमांक असणार नाहीत.
४) ही सांघिक स्पर्धा समजली जाईल
५) प्रत्येक स्पर्धकास किमान ४ मिनिटांचा व कमाल ५ मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल.
६) स्पर्धकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ बाद स्पर्धेतून बाद होईल.
७) स्पर्धेचा विषय निश्चित करून तो स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
८) प्रथम बोलणाऱ्या स्पर्धकासाठी खंडन करण्यास स्पर्धेच्या शेवटी २ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
९) सादरीकरण पद्य अथवा गीतात असू नये.
१०) सादरीकरणासाठी सहभागी स्पर्धकाचे लॉटस् काढून त्यांना बोलविण्यात येईल.

# * काव्य वाचन *

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.

२) काव्यवाचन मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमध्ये सादर करता येईल, ह्या स्पर्धेकरीता प्रत्येक महाविद्यालयास कोणत्याही एका भाषेमध्ये प्रवेशिका पाठविता येईल.

३) तिन्ही भाषेतील काव्यवाचनाचे एकत्रित मूल्यांकन करण्यात येईल, प्रत्येक भाषेकरिता स्वतंत्र स्पर्धा असणार नाही.

४) कविता सादर करण्यासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

५) स्पर्धकाने कविता 'स्वलिखित' असल्याचे हमीपत्र प्राचार्यांच्या सहीसह सादर करणे आवश्यक आहे. या हमीपत्राशिवाय कविता वाचनाला प्रवेश मिळणार नाही.

# नाट्य विभाग (Theatre Events)

## ✻ एकांकिका ✻

१) एकांकिका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी, परंतु एका महाविद्यालयास वरील पैकी एकाच भाषेतील फक्त एकाच एकांकिकेसाठी प्रवेशिका पाठविता येईल.

२) एकांकिका मराठी/हिंदी भाषेत असू शकेल परंतु नाटकाचा अंक प्रवेश सादर करता येणार नाही.

३) प्रयोगास किमान २५ मिनिटांचा व कमाल ३० मिनिटांचा वेळ दिला जाईल. प्राथमिक तयारीसाठी १० मिनिटांपेक्षा अधिक वेळ मिळणार नाही, (एकूण ४० मिनिटे)

४) प्रयोगास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकाचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.

५) एकांकिका स्पर्धेत भाग घेणारा संघ संपूर्ण मुलांचा अथवा मुलींचा अथवा संमिश्र असला तरी चालेल. परंतु पुरुषाची भूमिका पुरुषानेच आणि स्त्रियांची भुमिका स्त्रीयांनी करावी. (महिला महाविद्यालयाचे या नियमास अपवाद असतील.)

६) दिग्दर्शक विद्यार्थ्यांपैकीच असणे आवश्यक आहे.

७) एकांकितेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांची संख्या ९ पेक्षा जास्त असू नये.

८) सर्वसाधारणा प्रवेश योजना व सामान्यतः लागणारे फर्निचर सारखे साहित्य संयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतु काही विशिष्ट साहित्य लागत असल्यास त्याची व्यवस्था संघानेच करावी.

९) एकांकिकेच्या सादरीकरणासाठी संबंधित लेखकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.

१०) एकांकिका सादर करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी पत्र व एकांकिकेची संहिता याच्या तीन प्रती परीक्षकांकडे सादर करणे आवश्यक आहे.

११)साथीदारांची संख्या ३ पेक्षा जास्त असू नये

१२) एकांकिकेचे मूल्यमापन मुखः विषयाची निवड, अभिनय, रंगभूषा आणि प्रेक्षकांवरील एकंदर परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.

१३) वेळापत्रकानुसारच संबंधित महाविद्यालयाने प्रयोग सादर करणे आवश्यक व बंधनकारक आहे.

## * प्रहसन * (Skit)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.
२) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त ६ राहील
३) सादरीकरणासाठी किमान ८ मिनिटे व कमाल १0 मिनिटांचा वेळ दिला जाईल जास्तीत जास्त ३0 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४)नाटिकेस राष्ट्रीय व्यक्तीवर व राष्ट्रीयत्वावर टीका, चारित्र्यहनन अशा बाबींनचा समावेश असता कामा नये
५) स्पर्धकांना रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व पार्श्वसंगीत याचा वापर करात येईल.
६) सादरीकरण्यासाठी विषय - ज्या - त्या महाविद्यालयांनी निवडायचा आहे राष्ट्रीय एकात्मता, अंधश्रद्धा निर्मलून व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे. नाटिका विनोदी, विडंबनात्मक, उपहासात्मक असावी. मात्र ती टिकात्मक असू नये.
७) स्पर्धेचा निकाल विषयाची निवड, अभिनय, संरचना, प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
८) साथीदाराची संख्या जास्तीत जास्त ३ असेल

## * मूक अभिनय * (Mime)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठवता येईल.
२) मूकनाट्य ही शब्दविरहीत अभिनय, हावभाव, पवित्र आणि मुद्राभिनय यातून व्यक्त करावयाची कला आहे.
३) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त ६ राहील.
४) सादरीकरण्यासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त ३0 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
५) संघ मुलांचा, मुलींचा अथवा संमिश्र असू शकेल.
६) मूक अभिनय सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूची किंवा इतर साहित्याची परवानगी नाही.
७) ध्वनिमुद्रित केलेले पार्श्वसंगीत वापरण्यात परवानगी आहे.
८) स्पर्धेचा निकाल विषयाची निवड, संगीत, सादरीकरणातील संकल्पना, रंगभूषा, वेशभूषा व प्रेक्षकावरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
९) साथीदारांची संख्या जास्तीत जास्त २ असेल.
१0) वेशभूषेसाठी फक्त पांढऱ्या किंवा काळ्या रंगाचे कपडे वापरावेत.

## * मिमिक्री *

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) जास्तीत जास्त ३0 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४) स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिद्ध व्यक्तींच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वाचा ही समावेश असेल.
५) स्पर्धेचे मूल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, शब्दोच्चाराचे अनुकरण व सादरीकरण यावर अवलंबून राहिल.

# ललितकला विभाग (Fine Arts)

## * स्थळचित्रण * (चित्रकला)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धा प्रमुख, स्पर्धकास ज्या ठिकाणी घेऊन जातील त्या ठिकाणी सूचविण्यात आल्याप्रमाणे जागेवर चित्रण करावयाचे आहे.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्राचा आकार २२''१५'' असेल.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येईल.
७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
८) संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## * व्यंगचित्रण * (व्यंग चित्रकला)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) व्यंगचित्रणासाठी विषय आयत्यावेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्राचा आकार २२''१५'' असेल.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल,वॉटर,पेस्टल इत्यादी) रंग वापरता येईल.
७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
८) संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## * भित्तीचित्रण * (पोस्टर)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) भित्तीचित्रणासाठी विषय आयत्यावेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव तरतूद नाही.
५) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येतील.
६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतःआणावे.
७) संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## ✻ कातर काम ✻ (कोलाज)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेच्या ठिकाणीच वस्तुची निर्मिती करावयाची आहे.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्रासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
६) संयोजकांमार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## ✻ मृदमूर्तीकला ✻ (Clay Modeling)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेचा विषय आयत्यावेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
६) संयोजकांमार्फत फक्त क्ले, (माती) पुरविला जाईल.

## ✻ रांगोळी ✻

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेचा विषय आयत्यावेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) स्पर्धेतील रांगोळीची दृष्यरचना मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतू व्यक्त करणारी असावी.
६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
७) दिलेल्या २-२ च्या जागेवरच रांगोळी काढावी लागेल.
८) रांगोळी पावडर, रंगीत पावडर, फुलांच्या पाकळ्या, लाकडाचा भुसा किंवा तांदूळ यापैकी एकाच माध्यमाचा उपयोग रांगोळीसाठी असावा.

# ⁕ मांडणी कला ⁕ (इन्स्टॉलेशन)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.
२) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीतजास्त ४ राहिल.
३) सादरीकरणासाठी किमान दोन तास व कमाल अडिच तास वेळ दिला जाईल.
४) ललितकला स्पर्धा प्रकारामधील सहभागी विद्यार्थीच सदरील स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकतील.
५) विद्यापीठाकडून विषय दिला जाईल. त्या विषयांशी अनुसरुन कलाकृती निर्माण करावयाची आहे.
६) स्पर्धेचा निर्णय विषयाची बांधणी, कल्पकता, रचना, इत्यादी बाबींवर अवलंबून राहिल.
७) इन्स्टॉलेशनचे साईज ५ x ५ x ५ असेल. इन्स्टॉलेशन कोणाला तरी Artwork रचना (Structure) पर्यावरण (Environment) याविषयाशी किंवा जागेवर दिलेल्या विषयांशी निगडीत असावी.
८) स्पर्धक कलावंतांनी आयोजक स्थळावरील टाकाऊ वस्तुंचा आणि आजूबाजूच्या वस्तुंचा उपयोग करून कलाकृती तयार करावी.
९) बाजारात तयार कलाकृती किंवा विविध कलाप्रकारांचे तयार वस्तूंचा वापर करू नये.स्थळावरील (Raw) कच्चे मटेरियल वापरावे.

# ⁕ स्थळ छयाचित्रण ⁕ (स्पॉट फोटोग्राफी)

१) एका महाविद्यालयाचा एकच स्पर्धक संघात असावा.
२) स्पर्धक कलावंतांना १२ मेगा पिक्सल (Mega Pixel) पेक्षा कमी डिजीटल कॅमेरा आणावा.
३) डिजीटल कॅमेरामध्ये मेमरी कार्ड परिक्षकासमोर फॉरमॅट (Formet) स्पर्धेच्या जागी स्पर्धेच्या दिवशी करावा लागेल.
४) २ तास ३० मिनिटांचा अवधी असेल
५) स्पर्धेच्या ठिकाणी परिक्षकांनी दिलेल्या विषयांशी निगडीत पाच फोटोग्राफ स्पर्धकांना द्यावे लागतील.
६) मिक्सींग (Mixing) पूर्व रचना (Morphing) करण्याची परवानगी नाही.
७) फोटोशॉप सॉप्टवेअर (Software) इमेज (Image) चित्राचे सौंदर्य वाढवण्यासाठी वापर करण्यास परवानगी नाही
८) आयोजकांना स्पर्धक कलावंताची चित्र वापरण्याचा हक्क राहील तसेच हमीपत्रक स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी भरुन द्यावे.
९) डिजीटल चित्रे (Image) चा निर्गम,चित्राचा परिणाम (Impact) रचना (Composition) तांत्रिक गुणवत्ता (Technicals Quality) यावर ठरेल.
१०) आवश्यक वाटल्यास परिक्षक आणि आयोजक समिती अतिरिक्त वयोग्य ते नियम स्पर्धेच्या जागी घोषित होईल.

# महाराष्ट्राच्या लोककला

महाराष्ट्रातील प्रादेशिक किंवा बोली भाषेतच कला सादर करता राहील.

**वाद्य :-** पखवाज, दिमडी, संबळ, हलगी, चंडी, डफ, ढोलकी, ताशा, कच्ची, डमरु, पायपेटी, हर्मोनियम, सनई, बासरी, शिंग, सुन्द्री, पिपाणी, तुनतुने, विणा, एकतारी, टाळ, चिपळ्या, खंजिरी, खुळखुळा, घंटी, कडी, झांज, घुंगरु.

## १) वासुदेव :-

पार्श्वभुमी : श्रीकृष्णाचे रुप घेऊन पहाटेच्या पारी वासुदेव यायचा, गाणी म्हणायचा व भिक्षा मागायचा, जीवन विषयक तत्वज्ञान आणि दानाचं महत्व सांगायचा गायन करणे आवश्यक, प्रभावी संवाद साधणे. ठराविक लईत गिरक्या घेणे, हातातील टाळ व चिपळया लयबद्ध वाजवून सुरेल गायन करणे, दान दिल्यानंतर विलक्षण गतीने नाचत दान पावल्याची पावती देणे, जाताना वाडवडिलाचे नाव विचारणे, त्यांचा व पितरांचा नाम उल्लेख करुन सर्व देवतांना दान पावले करणे, एखादी गिरकी घेऊन पावा वाजवत पुढल्या दारी जाणे. संख्या : एक

**वेशभूषा** : डोक्यावर मोराची उंच निमुळती होत गेलेली मुकुटाकार टोपी, अंगात घोळदार अंगरखा, गळयात पूढे दोन्ही बाजूला सोडलेला शेला काखेतर झोळी, कमरेला खोवलेला पावा व जुना कोट कपाळी व कानाला चंदनाचा, टिळा असावा वाद्य :- टाळ, चिपळी, पावा, पायामध्ये घुंगरु साथीदार नाही.

• वेळ – ४ ते ५ मि. • सकाळी असावी .

## २) पोवाडा :-

शिवाजी महाराजांच्या काळी गोंधळी लोंकानी कवणांचा एक नविन प्रकार प्रचारत आणला हा प्रकार म्हणजेच पोवाडा वीर रसाने ओतप्रोत भरलेल्या पोवाड्यातून थकल्या भागल्या माणसांचे मनोरंजन व्हायचे व स्फूर्ती यायची.

**विषय** : ऐतिहासिक किंवा घटनांचे वर्णन, वीर पुरुषांचे शौर्य व स्वातत्र्यसेनानी यांच्या कार्याची वर्णन असावे.

**सादरीकरण** : पोवडा हा मुख्य शाहीरांने गावा शारीर पुरुष अथवा स्त्री असू शकते. पाठीमागे दोन ते पाच झेलकरी असावेत जे उपयुक्त विविध वाद्य वाजवून मुख्य शाहीराच्या गाण्याची साथ करु शकतील. झिलकरी साथीदारामध्ये पुरुष किंवा स्त्री असू शकतील गायन मर्दानी सुरेल व ताल लयबद्ध असावे. केवळ पदयात्मक (कवणे) असू नयेत. त्यामध्ये कथानकाचा भाग असावा. आवाजातील चढउतारा बराबरच. वीर, करुण, शांत आणि रसांची निर्मिती असावी.

**वेशभूषा** : डोक्यावर फेटा, बाराबदी अंगरखा किंवा नेहरु शर्ट, धोतर, पायजमा, जॉकेट, पगडी व शेला सादरकर्ती स्त्री कलाकार असेल तर नऊवारी साडी.

**वाद्य** : मुख्य शाहिराच्या हातात डफ इतारांच्या हातात दिमडी, शिंग, झांज, टाळ, कडी, तुनतुने, खंजरी, चंडी

• साथीदार :– ३ • वेळ :– ८ ते १० मि.

## ३) गोंधळ :-

घरातील मंगल कार्य निर्विघ्न पार पडल्या बद्दल देवीची आराधना, स्तुती आणि पूजा करुन तिच्या उपकार स्तवनाचा विधी म्हणजेच गोंधळ तुळजाभवानी रेणुकादेवी, अंबाबाई या कुलदैवताच्या नावाने गोंधळ घालण्याचा विधी महाराष्ट्रामध्ये प्रचलित आहे. देवीचा चमत्कार व देवस्थानाच्या वर्णन असलेल्या कथा, स्तुती नमन असते.

**सादरीकरण** : कथा निरुपण करणारा एक मुख्य गोंधळी एकुण ३ ते ६ कलावंत व्यासपिठावर असावेत सुरवातीला देवीची पारंपारिक पद्धतीने पूजा करावी. त्यासाठी देवीचा चौक, पूजेचे साहित्य व नैवैद्य इत्यादी असावे.

**क्रम** : पूजा, गण, देवदेवतांना आवाहन पारंपारिक गोंधळ पाऊड, व शेवटी देवीची आरती या क्रमाने सादरीकरण व्हावे.

गोंधळ मुख्य गायकाने गायन करुन सादर करावा. शक्य झाल्यास संबळ वाजवून सादर करावा. नृत्याला अधिक महत्व देऊ नये. गोंधळाच्या नाट्यात स्त्रीचा सहभाग नसतो. ज्वारीची किंवा उसाची पाच ताटे बांधून मध्ये लाल कपडा अंथरुन धान्याने गादी भरतात पाण्याने भरलेला तांब्या, पाच किंवा सात नाग वेलीची पाने उलटी देऊन मध्ये नारळ ठेवतात. धान्याच्या गादीवर घट ठेवून देवीचा टाक मांडतात समोर विडयाची पाच पाने मांडून त्यावर खारीक, खोबरे, सुपारी,पैसा ठेवून धूप किंवा उदबत्ती लावतात घटावर उसांच्या किंवा ज्वारीच्या तिटरणीला पूऱ्या, करंज्या व फुलांच्या माळा बांधतात.

**वेशभूषा** : गोंधळ्याच्या अंगात मखमली अंगरखे अथवा बाराबंदी, गळ्यात कवड्याच्या माळा डोक्यात कनगीदार पगड्या, गळ्यात देवीचा टाक, पायात घुंगरू, डोक्यावरती कवड्याची टोपी, परडी व पोत किंवा दिवटी इत्यादी उपयुक्त साहित्य असावे.

**वाद्य** : परडी संबळ, तुनतुने, दिमडी, डफ, झांज, अपवादात्मक ढोलकी होर्मोनियम

● मुख्यमंचावर ६ कलाकार ● वेळ : ६ ते ८ मि. ● साथीदार-३

## ४) भारूड :-

संत एकनाथ महाराजांनी समाज प्रबोधनासाठी व षडविकारांवर आसूड मारण्यासाठी भारुडाची सुरूवात केली. षडविकारांवर आसूड मांरण्यासाठी भारुडाची सुरुवात केली.

**विषय** : अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण, भ्रष्टाचार लोकसंख्या वाढ, स्त्रीभ्रूण हत्या इत्यादी विषयी जनजागृती व समाज प्रबोधन करणारे विषय मांडावेत.

**सादरीकरण** : भारुडात एक मुख्य गायक (निरुपणकार) व इतर दोन ते पाच सहगायक म्हणून घेता येतील पुरुष किंवा स्त्रीयांना भारुड सादर करता येईल संताची एखादी रचना असावी त्यावरुन विविध दृष्टांत देऊन निरुपण करावे विठ्ठलाचा जयघोष करत पाऊड खेळत स्पर्धकांचा व्यासपीठावर प्रवेश व्हावा. प्रतिकात्मक भूमिकामधून रुपात्मक पध्दतीने तत्वज्ञानाची मांडणी करावी गायन सूरेल व तालबद्ध व्हावे अभिनय व नाटकीकरणातून सादरीकरण व्हावे निंदा, नालस्ती, बदनामी असू नये.

**वेशभूषा** : नेहरु शर्ट, पगडी, फेटा, गांधी टोपी, धोतर, पायजमा, गळयात उपरणे, कमरेला शेला, कपळावर अष्टगंध, बुक्का असावा.

**वाद्य** : टाळ, चिपळया, पखवाज, तबला, पेटी, अपवादात्मक ढोलकी स्पर्धेचे कलावंत ३ ते ६

● साथीदार :- ३ ● वेळ :- ६ ते ८ मि.

## ५) भजन :-

थकल्या भागल्या वारकऱ्यांना ईश्वर भक्तीत रममान होण्यासाठी निखळ आनंद प्राप्तीसाठी किंवा अध्यात्माचा प्रचार व्हावा यासाठी संतानी महाराष्ट्रात भजनाची सुरुवात केली.

**विषय** : अध्यात्म, तत्वज्ञानाचा उपदेश असावा.

**सादरीकरण** : सुरवातीला विठ्ठलाचा जयघोष व्हावा त्यानंतर जय - जय राम कृष्ण हरीचा गजर व्हावा. त्यानंतर संताचा एखादा अभंग सादर व्हावा. पुरुष अथवा स्त्रियांना भजन सादर करता येईल. मुख्य गायक अथवा गायिका एकच असावी इतर दोन ते पाच सहगायक / गायिका असाव्यात ३ ते ६ स्पर्धक मंचावर असावेत रागदरबारी युक्त आलाप व तानांचा वापर करता येईल.

**वेशभूषा** : नेहरु शर्ट, धोतर, डोक्यावर पागोटे, गळयात तुळसीच्या माळा, मुलींसाठी नऊवारी साडी.

**वाद्य** : टाळ, एकतारी, विणा, चिपळया, पखवाज, तंबोरा

● कलावंत : ३ ते ६ ● साथीदार : ३ ● वेळ : ४ ते ५ मि.

## ५) लोकगीत :-

**पार्श्वभूमी** : लोकांनी लोंकासाठी गायलेले गीत म्हणजे लोकगीत होय उत्सव, सण, समारंभ, विविध संस्कार प्रसंगी ग्रामीण भाषेत लोकगीत गायली जातात.

**विषय** : ग्रामीण जीवन, उत्सवाचे वर्णन, संस्कार, आशा - निराशा, सुख दुःखाचे प्रतिबिंब किंवा लोकगीतामधून दिसते.

**प्रकार** : ओवी, पाळणा, धनगरी गीते, अराधीगीते, विवाहगीते, भूलई, उखाणे, शेतकरी गीते, गण-गवळण, भूपाळी, निसर्ग गीते इ.

**सादरीकरण** :- लोकगीत ग्रामीण अथवा बोली भाषेत असावे. त्या-त्या लोकगीता नुसार पारंपारिक वेषभूषा असावी लोकगीताला अनुसरून पारंपारिक वाद्य असावीत नृत्याला महत्व असू नये व्यासपिठावर ३ ते ६ स्पर्धेकांना सहभागी होता यईल मुले, मुली अथवा मुला मुलींचा संघ असेल.

● कलावंत :- ३ ते ६ ● साथीदार :- ३ ● वेळ :- ४ ते ५ मि.

## ७) लोकनाट्य

हा कलाप्रकार पारंपारिक असून त्याची शैली ही लोकधर्मी आहे. म्हणजेच लोकांनी लोकांसाठी केलेले नाट्य म्हणजेच लोकनाट्य होय याचा मूळ उद्देश हा लोकरंजनातून समाजप्रबोधन हा आहे.

**घटक** :- गण, गोळण, लावणी, बतावणी, वग व भैरवी हे पारंपारिक असावे.

**विषय** :- सामाजिक, राजकीय, कौटुंबिक व विनोदी असावेत. सादरीकरणतून अस्सल गावराण रांगडेपणा, विनोद निर्मिती, परिस्थितीवर वंग्यात्मक ताशेरे याचे वैशिष्ट्य आहे. संवाद अस्सल ग्रामीण बोलीभाषेतून असावेत.

**वाद्य** :- ढोलकी, डफ पेटी, टाळ तुणतुने इत्यादी पारंपारिक वाद्य असावीत.

● स्पर्धक संख्या :- ३ ते ६ ● साथीदार :- ३ ● वेळ :- १० ते ३० मि.

युवक महोत्सव २०१३-१४

# महत्त्वाचे नियम

## ⁕ प्रवेश शुल्क :-

युवक महोत्सवामध्ये भाग घेण्याकरिता विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क ठरविले आहे.

१) प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता १००/-

२) प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता ५०/-

स्पर्धक महाविद्यालयाने आपण भाग घेतलेल्या एकूण स्पर्धेच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक सांघिक/वैयक्तिक स्पर्धेप्रमाणे आवश्यक त्याशुल्काची रक्कम मा.कुलसचिव डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांच्या नावे डिमांड ड्राफ्टने (डी.डी.) पाठवावे.

अथवा विद्यापीठाच्या कार्यालयात नगदी भरणा करावा. प्रवेशशुल्काचा भरणा विद्यापीठाच्या कार्यालयात केल्याशिवाय प्रवेश अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## ⁕ स्पर्धकांचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता :-

युवक महोत्सवात भाग घेणाऱ्या संघातील विद्यार्थी कलाकारांचा व संघप्रमुखांचा महाविद्यालयापासून स्पर्धेच्या ठिकाणापर्यंत जाण्या येण्याचा प्रवासखर्च दैनिकभत्ता इतर खर्च ज्या त्या महाविद्यालयांनी करावयाचा असून त्यांच्या निवासाची व्यवस्था यजमान महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येईल.

## ⁕ संघव्यवस्थापक :-

प्रत्येक महाविद्यालयाच्या संघाबरोबर एक प्राध्यापक/प्राध्यापिका व १० विद्यार्थी संख्येच्या पुढे दोन संघव्यवस्थापक मान्य केले जातील. संघव्यवस्थापकांनी आपला दैनिक भत्ता व प्रवास खर्च आपल्या महाविद्यालयाच्या फंडातून करावयाचा आहे.

## ⁕ स्पर्धकांची पात्रता :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये/संस्था तसेच सर्व प्रमाणीत पदव्युत्तर वर्गात पूर्णवेळ शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष मुदतीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना युवा महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. प्रोव्हिजनल ॲडमिशन मान्य केले जाणार नाही.

स्पर्धकाचे वय स्पर्धेच्या तारखेस २५ वर्षापेक्षा कमी असावे. वय २५ वर्षे पूर्ण असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.सहभागी होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीने विद्यापीठात/महाविद्यालयात प्रवेश घेऊन सात वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला असल्यास असा विद्यार्थी/विद्यार्थीनी भाग घेऊ शकणार नाही.

## ⁕ संघाची क्षमता :-

संघातील एकूण स्पर्धकांची संख्या ४५ पेक्षा जास्त नसावी. कोणत्याही स्पर्धकास अनेक स्पर्धा प्रकारात भाग घेता येईल.

## ⁕ साहित्य :-

प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी आपल्या बरोबर आणावे. संयोजकाकडून कोणतेही साहित्य पुरवले जाणार नाही.

ग्रामीण संघासाठीचा उत्कृष्ट संघ पुरस्कार ग्रामपंचायत असलेल्या ठिकाणच्या महाविद्यालयास देण्यात येईल.

## ⁕ कपडे / बिछाने :-

स्पर्धकांनी त्यांना आवश्यक असणारे कपडे/बिछाने आपल्याबरोबर आणावेत. संयोजकाकडून कपडे/बिछाने पुरविले जाणार नाहीत. सादरीकरणाच्या वेळेची नोंद सहभागी महाविद्यालयातील संघप्रमुखांनी त्यांच्या संघाच्या प्रत्येक कला प्रकाराचे सादरीकरण करण्यापूर्वी ५ मिनिटे अगोदर वेळाधिकाऱ्याशी (टाईम किपरशी) संपर्क साधावा. संघप्रमुखाने सादरीकरणाच्या प्रारंभीची व समाप्तीच्या वेळेचे नोंद घेऊन स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

## ⁕ तक्रार निवारण :-

स्पर्धक कलाकारांनी आपल्या तक्रारी संबंधित व्यवस्थापक प्राध्यापकांमार्फत युवक महोत्सव समितीकडे रु.१००/तक्रार निवारण शुल्क भरून लेखी सादर कराव्यात.सदर शुल्काचा परतावा होणार नाही.तक्रारी संदर्भात विद्यापीठ युवक महोत्सव समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तक्रार अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे.

## विद्यापीठ युवक महोत्सव संघ :-

युवक महोत्सवाकरिता विद्यापीठ संघ निवडीचे सर्व अधिकार विद्यापीठ युवक महोत्सव समितीकडे असतील. विद्यापीठ संघनिवडतांना महाविद्यालयाचा विजेतासंघ आहे तसा निवडला जाणार नाही. परीक्षक मंडळाच्या शिफारशी नुसार विद्यापीठ संघाची निवड करण्यात येईल.

## स्पर्धेसंबंधीचे इतर नियम :-

१) प्रत्येक विद्यार्थी कलाकाराने सोबतच्या नमुन्यातील ओळखपत्र सतत जवळ बाळगले पाहिजे. ओळखपत्र दाखविल्याशिवाय स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२) सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींनी सर्व कार्यक्रमांना वेळेवर उपस्थित राहिले पाहिजे.

३) स्पर्धा सुरु होण्यापूर्वी नियोजित स्थळी स्पर्धकांनी १० मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.

४) स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच भाग घेता येईल ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

५) कोणत्याही वाद्यांचा,वस्तुंची अगर साहित्यांची मोडतोड केल्यास त्याची भरपाई संबंधित व्यक्तिकडून करून घेतली जाईल.

६) संयोजकाच्या पूर्व परवानगी शिवाय स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थीनीस महोत्सव परिसर सोडता येणार नाही.

७) स्पर्धेच्या ठिकाणी सर्व स्पर्धकांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावयाचे आहे. बेशिस्त वर्तन करणाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

८) संगीत,नृत्य,नाट्य या सर्वस्पर्धेतील सहभागी संघाची किंवा वैयक्तिक स्पर्धेतील एकूण साथीदारांची संख्या ९ पेक्षा अधिक असू नये याची नोंद घ्यावी.

९) व्यावसायिकं साथीदारांची संख्या ३ पेक्षा अधिक असू नये.व्यावसायीक साथीदारांची नोंद विद्यार्थी अशा करू नये. तसे आढळल्यास ते गैरशिस्तीचे वर्तन मानले जाईल.इयत्ता ११वी व १२ वी मधील विद्यार्थी साथीदार हा व्यावसायिक साथीदार मानला जाईल.

१०) कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत कोणत्याही प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते गैरशिस्तीचे वर्तन मानण्यात येईल.

११) परीक्षक मंडळानी घेतलेले निर्णय अंतिम व बंधनकारक असतील.

१२) युवक महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी कलाकारांनी आपल्या जन्मतारखेची नोंद असलेली माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेशिकेसोबत जोडणे बंधनकारक आहे.

डॉ. चेतना प्र. सोनकांबळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

✻ विद्यार्थी कल्याण विभाग ✻

युवक महोत्सव २०१३-१४

## ✻ नमुना प्रवेशपत्रक ✻

**मुख्य स्पर्धा प्रकाराचे नांव : संगीत/नृत्य/नाट्य/वाङ्मय/ललितकला/महाराष्ट्राच्या लोककला**

| अ.क्र. | कलाकार/साथीदार यांचे नांव (आडनाव प्रथम) | स्त्री/पुरुष | शिकत असलेला वर्ग | जन्म तारीख | सहभागी होणाऱ्या स्पर्धेचा नांव (फक्त जो विद्यार्थी कलाकार आहे त्याच्या नावापुढे लिहावीत) | येथे फक्तसाथीदारांचा विद्यार्थी, साथीदार किंवा धंदेवाईक साथीदार असा स्पष्ट उल्लेख करावा. | राष्ट्रीय युवक महोत्सवात सहभागी होता काय? केंव्हा? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

सांस्कृतिक विभाग प्रमुख

प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का

युवा महोत्सव 2013-14

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,Aurangabad.**

Youth Festival 2013-14

(Identity Certificate for Participants/ Accompanist

(Strikeout which is not applicable)

Participating College, ______________________________

______________________________

A) 1. Name of Participant Student ______________________________

(in block letters)

2. Mother's Name ______________________________

(In block letters)

3.Date of Birth ______________________________

4. Class ______________________________

5. Item of participation

6. Year of passing 12th of equivalent diploma ______________________________

(B) Accompanist's Name ______________________________

I. Professional/Student ______________________________

II. Standard (if student) ______________________________

(C) Address ______________________________

______________________________

**Signature of Student**
(Participant/ Accompanist)

Certified that particular given above are correct to the best of my knowledge and belief

Date :

**Signature of Cultural Officer**

**Signature of the Principal with Seal**

Note : 1. The participating student shall carry this identity certificate with him/her and shall produced it as and when neccessary for identification falling which he/she shall not beallowed to participate in the youth festival competition.
2. Submit Xerox copy of the identity certificate at the of Registration.

युवक महोत्सव २०१३-१४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

## युवक महोत्सव-२०१३-१४

### स्पर्धा निहाय कलाकार, साथीदार व वेळेचे विवरण

| स्पर्धा | सहभागी कलाकारांची संख्या | | | वेळ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलाकार | साथीदार | एकूण | किमान | कमाल | अधिकचा |
| **संगीत** | | | | | | |
| समूह गायन (भारतीय) | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| समूह गायन (पाश्चात्य) | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| शास्त्रीय सूरवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| शास्त्रीय तालवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| सुगम गायन (भारतीय) | १ | २ | ३ | ४ मि. | ६ मि. | ३० सेकंद |
| सुगम गायन (पाश्चात्य) | १ | २ | ३ | ४ मि. | ६ म. | ३० सेकंद |
| लोक वाद्यवृंद | ९ | ३ | १२ | ७ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| शास्त्रीय गायन | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| उपशास्त्रीय गायन | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| **नृत्य** | | | | | | |
| लोक / आदिवासी नृत्य | १० | ५ | १५ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| शास्त्रीय नृत्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| क्रिएटिव्ह नृत्य | १ | ३ | ४ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| **वाङ्मय** | | | | | | |
| प्रश्नमंजुषा | ३ | - | ३ | २५ मि. | ३० मि. | ३० सेकंद |
| वक्तृत्व | १ | - | १ | ४ मि. | ५ मि. | ३० सेकंद |
| वादविवाद | २ | - | २ | ४ मि. | ५ मि. | ३० सेकंद |
| काव्यवाचन | १ | - | १ | ४ मि. | ५ मि. | ३० सेकंद |
| **नाट्य** | | | | | | |
| एकांकिका (मराठी/हिंदी) | ९ | ३ | १२ | २५ मि. | ३० मि. | ३० सेकंद |
| प्रहसन | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| मुक अभिनय | ६ | २ | ८ | ४ मि. | ५ मि. | ३० सेकंद |
| नकला (मिमिक्री) | १ | - | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| **ललित कला** | | | | | | |
| स्थळ चित्रण (चित्रकला) | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| भित्ती चित्रण (पोस्टर) | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| व्यंग चित्रकला | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| माती काम मृदमूर्तिकला) | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| कातरकाम (कोलाज) | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| रांगोळी | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| इन्स्टॉलेशन | ४ | - | ४ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| स्पॉट फोटोग्राफी | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| **महाराष्ट्राच्या लोककला** | | | | | | |
| पोवाडा | ६ | ३ | ९ | ६ मि. | 10 | |
| भारुड | ६ | ३ | ९ | ८ मि. | | |
| वासुदेव | १ | - | १ | ५ मि. | | |
| गोंधळ | ६ | ३ | ९ | ८ मि. | | |
| भजन | ६ | ३ | ९ | ५ मि. | | |
| लोकगीत | ६ | ३ | ९ | ५ मि. | | |
| लोकनाट्य | ६ | ३ | ९ | १० मि. | 30 मि | |

युवक महोत्सव २०१३-१४

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

विद्यार्थी कल्याण विभाग

## युवक महोत्सव-२०१३-१४

# तक्रार निवारण अर्ज

नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक
विद्यार्थी कल्याण
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

**विषय : तक्रार निवारण अर्ज**

महोदय,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

(तक्रारीचा तपशील)

आपला विश्वासू
(संघ प्रमुखाचे नांव व स्वाक्षरी)
फोन नं.
(महाविद्यालयाचे नांव)

(कृपया वरील तपशील त्वरीत पाठवावा.)

युवक महोत्सव २०१३-१४

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

विद्यार्थी कल्याण विभाग

# युवक महोत्सव-२०१३-१४

## गुणवत्ता तक्ता

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | महाविद्यालयाचे नांव | स्पर्धा | उत्तीर्ण परीक्षा अथवा प्राविण्य | संपर्कासाठी फोन नं. |
|---|---|---|---|---|---|
| | | | संगीत | | |
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |
| | | | नृत्य | | |
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |
| | | | नाट्य | | |
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |
| | | | वाङ्मय | | |
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |
| | | | ललित कला | | |
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |

या तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांने ज्या-ज्या कलाप्रकारामध्ये विशेष प्राविण्य अथवा परिक्षा उत्तीर्ण केलेल्या असतील त्याच विद्यार्थ्यांची माहिती सदरील तक्त्यात भरावयाची आहे. उदा. वाद्य वाजविण्यात पारंगत. संगीत परीक्षा उत्तीर्ण नाट्य,पदवी नृत्य प्रशिक्षण

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

विद्यार्थी कल्याण विभाग

# केंद्रीय युवक महोत्सव-२०१३-१४

## सल्लागार समिती

**डॉ. विजय पांढरीपांडे**
मा. कुलगुरू

**प्रा. दिलीप बडे**
नंदनवन कॉलनी,
औरंगाबाद

**डॉ.दासू वैद्य**
मराठी विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**डॉ. संजय नवले**
हिंदी विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**डॉ. हनुमंत भूमकर**
सौ. के.एस.के.महाविद्यालय
बीड

**डॉ. बिना सेन्गर**
इतिहास विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**डॉ. चेतना प्र. सोनकांबळे**
संचालक,विद्यार्थी कल्याण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**श्रीमती करूणा काशिनाथ जाधव**
सचिव
विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगबाद

**डॉ. धनराज माने**
मा. कुलसचिव

**प्रा.संभाजी भोसले**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
तुळजापुर जि. उस्मानाबाद

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे**
प्राणीशास्त्र विभाग
जे.ई.एस.महाविद्यालय, जालना

**डॉ. सुभाष राऊत**
शिवतीर्थ पांडुरंगनगर, बार्शी रोड,
विद्यालयाजवळ नं. ११, बीड

**डॉ.मिलिंद माने**
व्यंकटेश महाजन महाविद्यालय,
उस्मानाबाद

**प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे**
व्यवस्थापनशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**प्रा. डॉ. राजेश करपे**
कार्यक्रम समन्वयक-राष्ट्रीय सेवा योजना
विभाग डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद

**श्री. सानप गजानन**
अधिसभा सदस्य
सी-९४, मुकुंद को-ऑप हाऊसिंग सोसयाटी,
महाजन कॉलनी, सिडको एन-२, औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंग बाद

✲ विद्यार्थी कल्याण विभाग ✲

युवक महोत्सव २०१३-१४

सहभाग निश्चिती व विवरण पत्र

नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक
विद्यार्थी कल्याण
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**विषय : युवक महोत्सव २०१३-१४**

महोदय,

विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवामध्ये आमच्या महाविद्यालयाचा सहभाग निश्चित आहे.
त्यामुळे आमच्या महाविद्यालयाच्या युवक महोत्सव संघाचे पूर्ण विवरण पुढीलप्रमाणे देत आहोत.

१) महाविद्यालयाचे नांव : ------------------------------------------

२) संघ व्यवस्थापकाचे नांव : ------------------------------------------

पत्ता : ------------------------------------------

दूरध्वनी क्र. -------------------- भ्रमणध्वनी क्र. ----------------------

३) सहभागी कलाकारांची एकूण संख्या : ----------------------------------

पुरुष : ------------------------------

स्त्री : ------------------------------

४) साथीदारांची एकूण संख्या

पुरुष : ------------------------------

स्त्री : ------------------------------

५) संघव्यवस्थापक/एकूण संख्या

पुरुष : ------------------------------

स्त्री : ------------------------------

६) महाविद्यालय संघातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या :

दिनांक　　　　　　　　सांस्कृतिक विभाग प्रमुख　　　　　　　　प्राचार्य

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## औरंगाबाद



युवक महोत्सव

२०१३-१४